# धरतीला स्वर्ग बनवायचे आहे

सेवा मध्ये

भारत देशाची माननीय जनता जनार्दन

तसेच माननीय न्यायालय,

विषय :– मानवतेचे पतन तसेच स्त्रियांवर होत असलेले लैंगिक अत्याचार, वाईट चालीरीती तसेच दुष्कर्म थांबवण्यासाठी जनहित याचिका.

निवेदन : देशातील मानवतेच्या अधःपतनामुळे दररोज होत असलेले लैंगिक अपराध, महिलांचे यौन–शोषण, हत्या, सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांद्वारे होत असलेला भ्रष्टाचार, बँक घोटाळे, हुंडयामुळे नववधूंच्या होत असलेल्या आत्महत्या, अनेक कारण सासू–सासरे, नणंद, पती व अन्य कुटुंबीय तुरुंगात जातात. कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अमली पदार्थांचे सेवन केल्यामुळे तरुणवर्गाचा नाश होत आहे. या सर्वांच्या समाधनासाठी आमचे सतगुरु संत रामपाल दास जी द्वारा केले जात असलेले प्रयत्न जनतेपर्यंत पोहोचवण्यात येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी निवेदन.

भारतवर्षात आम्ही संत रामपाल दास जी महाराजांचे जवळपास नव्वद (९०) लाख अनुयायी आहोत. आम्ही विश्वास पूर्वक म्हणत आहोत की जर संत रामपाल दास जींचे सत्संग विचार भारतातील जनतेने ऐकले तर भारताची धरती स्वर्ग होईल. त्यांच्या विचारांमुळे प्रभावित होऊन आम्ही सर्व अनुयायी सामान्य तसेच सभ्य व सुखी जीवन जगत आहोत.

## ''मानवतेच्या ऱ्हासाचे कारण''

संसारामध्ये दिवसेंदिवस मानवता तसेच चांगल्या संस्कृतीचे पतन होत आहे. कारण :–

माध्यमांमध्ये तरुणांना (मुले–मुलींना) आकर्षित करून पैसे कमावण्याच्या उद्देशाने बनविले जात असलेले चित्रपट, ज्यांमध्ये भारतीय संस्कृतीविरुद्ध दृष्ये दाखवली जातात जे सभ्य समाजाला कधीच शोभा देत नाही .

उदाहरण :– चित्रपटांमध्ये मुलगा–मुलीच्या प्रेम कथेमध्ये एक–दुसऱ्याचे चुंबन करताना दाखविणे. मुलीचे घरच्यांपासून लपून आपल्या प्रियकराला भेटायला जाणे. तसेच मुलाचे आपल्या परिवारापासून लपून विशिष्ठ पोषाख जो सभ्य समाजामध्ये अशोभनीय आहे, घालून मुलीला भेटायला जाणे. वर्तमानपत्रात मुला–मुलींची अर्धनग्न छायाचित्रे किंवा तोकडे–ओंगळ कपडे जे २ ते ८ वर्षांच्या मुली परिधान करतात, त्या पोषाकास मोठ्या तरुणी ज्या १८–२० वर्ष किंवा त्याहूनही मोठ्या वयाच्या आहेत, त्यांना परिधान केलेले दाखवणे ज्याचा दुष्परिणाम चित्रपट पाहणाऱ्या तरुण मुलींवर पडतो. ज्यामुळे हा दुष्प्रभाव भारत देशातील शहरांमध्ये राहणाऱ्या परिवारातील मुलांवर अगोदर पडतो. मग त्या शहरी परिवारांचे नातेसंबंध खेड्यात असतात. ग्रामीण भागातील मुले–मुली जे शहरांमध्ये आपल्या नातेवाईकांच्या घरी जातात तर ते त्यांना पाहून गावामध्ये देखिल तसेच आचरण करतात. गावात जे मोठ्या घरांतील मुले असतात, त्यांनी कसाही पोषाख घातला, त्यांना ग्रामीण लोक मना करू शकत नाहीत कारण की त्यांची ओळख उच्च अधिकारी तसेच उच्च राजकीय नेत्यांपर्यंत असते. या भीतीने गावातील सभ्य समाजातील व्यक्ती गप्प राहणेच योग्य समजतात. ज्या कारणामुळे ही अश्लीलता भारतातील गावांमध्ये देखिल आग लावू लागली आहे. तरुण मुले आपली मनमानी करतात. आई–वडील या भीतीने जास्त दबाव नाही टाकत कि कुठे मूलाने नाराज होऊन चुकीचे पाऊल टाकायला नको.

समाधान :- संत रामपाल जी द्वारा सत्संगामध्ये सामाजिक वाईट चालीरीती, वेशभूषा, अंमली पदार्थांचे सेवन करणे, अश्लीलता व व्यभिचारामुळे होत असलेली मानवतेची हानी तसेच सभ्यतेची हानीला तर्क देऊन विशेष प्रभावी पद्धतीने समजावले जाते. सत्संगामध्ये नवीन परिवार येतात. त्यांच्याबरोबर तरुण मुले-मुली देखील येतात. सत्संगामध्ये अगोदर पासून जोडलेल्या परिवारातील तरुण मुले-मुली देखील उपस्थित असतात जे उच्च शिक्षण प्राप्त देखिल असतात आणि आपल्या स्वदेशी पोषाख घातलेले असतात. नवीन परिवारातील मुले त्यांना पाहून आपल्या कपड्यांना चांगले समजत नाहीत. ते देखिल एक किंवा दोन वेळा सत्संगामध्ये आल्यानंतर आपला चुकीचा पेहराव परिधान करणे सोडून देतात. ज्याप्रमाणे अश्लील पोषाकांना हळू-हळू देखा-देखी तरुण मुलांनी स्थान दिले त्याचप्रमाणे सत्संग विचारांनी तसेच सत्संगला आलेल्या जुन्या श्रद्धाळुंच्या मुलांचा संग केल्याने त्यांना पाहून हळू-हळू त्यापासून दूर होतील. मानव समाजामध्ये वर्तमानात होत असलेले बलात्कार, लैंगिक शोषणाचे अपराध तसेच चोरी- दरोडे, भ्रष्टाचाराच्या अपराधांना समूळ नष्ट करण्याकरिता एकमात्र विकल्प संत रामपाल दास जींचे सत्संग विचार तसेच त्यांच्या अनुयायांचे सभ्य आचरण तसेच शालीनतेला मानव समाजाच्या समोर प्रस्तुत करणे आहे. या तथ्याच्या पडताळणीसाठी आपण संत रामपाल दास जींच्या अनुयायांना (भक्त तसेच भक्तमती) पाहू शकता. ते सर्व सामान्य वेशभूषामध्ये असतात. भक्तमती बाहेरील दिखाव्यासाठी कोणताही विशेष मेकअप करत नाहीत. परमात्म्याने जसे बनवले आहे, त्यांच्यासाठी तेच सर्वोत्तम आहे.

विशेष :- सत्संग तर अन्य संत व प्रचारक देखील करतात अशी शंका होणे अनिवार्य आहे. मग फक्त संत रामपाल जींद्वारा केलेल्या सत्संगांचे महिमामंडन कशासाठी केले जात आहे? याचे उत्तर हे आहे की आम्ही (जे श्रद्धाळू इतर संतांना सोडून संत रामपाल दासजींकडे आले आहेत) इतर सत्संगांमध्ये जाऊन देखिल पाहिले आहे कारण आम्ही बहुतेक श्रद्धाळू इतर गुरुंना सोडून संत रामपाल दास जी यांच्याशी जोडलेले आहोत. त्या सत्संगांमध्ये कोणी कोणताही ड्रेस परिधान करुन या, कोणतीही मनाई नाही. त्याचे अनुयायी तंबाखूचे सेवन करतात. इतर गुरू जी सत्संगामध्ये अमली पदार्थ सेवनास मनाई देखिल करतात, परंतु विशेष प्रतिबंध नाही जसे कि संत रामपाल जी बंधनकारक करतात. इतर सर्व संतांची साधना धर्मग्रंथांच्या विपरित आहे जे साधकाच्या मानव जन्मास तर नष्ट करते, सोबतच मानवतेचा देखील ऱ्हास होत आहे कारण परमात्म्याची शास्त्र प्रमाणित साधना केल्याने साधकाला ते सर्व लाभ (घरामध्ये शांती, व्यापारामध्ये लाभ, अपघातातून वाचविणे, आजारांपासून रक्षण तसेच मोक्ष) प्राप्त होतात जे परमात्माकडून अपेक्षित आहेत, ज्याच्यासाठी साधक भक्ती करतो.

श्रीमद्भगवत गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे की जे साधक शास्त्रविधीला त्यागून मनमानी आचरण करतात, त्यांना ना सुख प्राप्त होते, ना आध्यात्मिक भक्तीची शक्ती म्हणजेच सिद्धी ज्यांमुळे कार्य सिद्ध होतात, प्राप्ती होते आणि ना त्यांची गती म्हणजेच मुक्ती होते. परमात्माकडून हेच लाभ प्राप्त करण्यासाठीच साधक साधना करतो. त्या चुकीच्या साधना सांगणाऱ्या गुरुंच्या अनुयायांचा परमात्म्यावरील विश्वास उडुन जातो. मग ते कोणतेही दुष्कर्म करण्यामध्ये संकोच करत नाही. विश्वामध्ये अशांती तसेच उपरोक्त अपराधांच्या कारणांमुळे होत असलेल्या मानवतेच्या पतनाचे एक कारण हे देखिल आहे कारण ज्या सात्विक प्रकृतीच्या व्यक्ती (स्त्री/पुरुष) आहेत, ते स्वभावाने नम्र व प्रामाणिक तसेच परमात्म्याला घाबरणारे असतात. ते संतांच्या शरणी जातात. परमात्माकडून आपल्या कुटुंबासाठी सुख-शांती आणि मोक्षाची कामना करतात. शास्त्रविरुद्ध भक्तीने या मनोकामना कधी पूर्ण होत नाहीत कारण हे परमात्म्याचे विधान धर्मशास्त्रामध्ये (श्रीमद्भगवत गीता) लिहिलेले आहे जे अटळ आहे. ते शास्त्रविरुद्ध साधना सांगणाऱ्या गुरूंचे शिष्य हताश होऊन गरजांच्या पूर्तीसाठी (मनोकामना सिद्ध होण्यासाठी) लाच घेणे, भेसळ करणे, फसवणूक करणे, अश्लील चित्रपटांचा व्यवसाय करणे, अंमली पदार्थांची

तस्करी करणे. फायदा–तोटा झाल्यामुळे आनंद तसेच दुःखाचे नाटक करुन दारु वगैरेचे सेवन करणे. मग नशेच्या प्रभावाखाली बलात्कार (रेप), विनयभंग अशी अनैतिक कृत्य करणे स्वाभाविक आहे, करु लागतात. ते असुरी स्वभावाचे बनतात. विश्वामध्ये एकमात्र शास्त्रविधि अनुसार साधना संत रामपाल दासजी महाराजांच्या व्यतिरिक्त वर्तमानातील कोणत्याही धर्मगुरूंच्या जवळ नाही. हा पडताळणीचा विषय आहे. माननीय न्यायालय केस मध्ये सर्व धर्मगुरुंना पक्ष बनवून स्वत: चौकशी करावी. सर्वांनी आप–आपला पक्ष कोर्टामध्ये ठेवावा. जर ही सुनावणी लाईव्ह चालविली गेली तर भारतातील जनतेला हातोहात सत्यता प्राप्त होईल. देशातील जनता देखिल आपल्या डोळ्यांदेखत सत्य पाहून धन्य होऊन जाईल. भारत देश स्वर्ग तर बनेलच, पूर्वीचा सोनेरी पक्षी देखिल होईल. त्राही–त्राही समाप्त होईल.

संत रामपाल दास जी त्या सर्वांना जे दीक्षा घेण्यासाठी त्यांच्याकडे येतात, म्हणतात कि अगोदर सत्संग ऐका, सत्संगाची **D.V.D.** व चिप घेऊन घरी देखील ज्ञान समजून घ्या. आमच्या सर्व नियमांचे पालन करावे लागेल. आपणास मान्य असेल तर दीक्षा घेऊ शकता. जर दीक्षा घेऊन कोणताही नियम भंग केला तर परमात्म्याच्या भक्तीमुळे मिळणारा लाभ बंद होईल. जसे विजेचे कनैक्शन घेतल्यामुळे वीज पूर्ण लाभ देते जे अपेक्षित असते. जर एखाद्या चुकीमुळे कनेक्शन तुटले गेल्यास सर्व लाभ बंद होतात. चुक दुरुस्त करुन पुन्हा कनेक्शन घेतल्यानंतर पुन्हा लाभ होतो. याचप्रमाणे ज्या श्रद्धाळूंकडून चुकून नियम भंग होतो, त्याला आपली चूक मान्य करावी लागते. भविष्यात चुका न करण्याचे आश्वासन द्यावे लागते. त्यानंतर त्याला पुन्हा दीक्षा दिली जाते. ज्या कारणामुळे आम्हा सर्व संत रामपालजींचे अनुयायांवर परमात्म्याची कृपा सदा प्राप्त असते. आमची लहान–मोठी मुले सुद्धा नियमभंग होण्याच्या भीतीने कोणतीही चूक करत नाहीत. त्यामुळे आम्ही सर्व प्रामाणिक व सुखी जीवन जगत आहोत. संत रामपाल जी महाराज प्रोजेक्टर द्वारा सर्व शास्त्रांना सत्संगांमध्ये पुरावा म्हणून श्रोत्यांना अवगत करतात. इतर गुरूंचे अनुयायी शास्त्रांमध्ये लिहिलेली भक्तीविधी पाहुन समजून घेतात की आमच्या गुरुजींद्वारा सांगितलेली भक्ती साधना शास्त्रांमधील नाही. त्या गुरूंचा त्याग करुन संत रामपाल जींकडून दीक्षा घेऊन आपले जीवन धन्य करतात. या कारणामुळे इतर गुरुजन, संत रामपाल जींच्या सोबत ईर्ष्या करतात. त्या गुरूंची झेप मोठ्या राजनेत्यांपर्यंत आहे. ज्या कारणामुळे संत रामपाल दासजींना बदनाम केले जात आहे तसेच खोटे खटले बनवून वारंवार तुरुंगामध्ये टाकले जात आहे. ते चार खटल्यांतुन मुक्त झालेले आहेत.

पडती मानवता हीच मानव समाजाच्या अशांतीचे कारण आहे. या कारणामुळेच लैंगिक गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे.

★ एक माई (वृद्ध महिला) अनुयाईने सांगितले की आज सन २००५ च्या सुमारे ५० वर्षांपूर्वी माता–भगिनी शेतात शेतकामासाठी तसेच मजूरी करण्यासाठी निर्भय होऊन जात असत. कोणी व्यक्ती किंवा तरूण पुरुष डोळे वर करुन परस्त्री व मुलीकडे पाहत नसे. मुलगी व बहीण किंवा काकू, ताई अशा आदरणीय शब्दांनी संबोधित करत होते. सन १९७० नंतर जन्माला आलेली मुले जे वर्तमानात तरुण आहेत किंवा १५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत, यांच्या मध्ये ६० टक्के सभ्यता व माणुसकी जवळपास नष्ट झाली आहे. हे सर्व काम चित्रपटाने बिघडवले आहे. त्या माईने सांगितले की दहा दिवसांपूर्वी माझ्या लहान मुलाच्या मुलीसोबत एक लाजिरवाणी घटना घडली. मला तीन मुलगे आहेत. तिघेही वेगवेगळे झालेले आहेत. मुला–बाळांवाले आहेत. मधल्या मुलाच्या पत्नीचे कुटुंब संत रामपाल दास जींचे अनुयायी आहेत. मधल्याची पत्नी कौशल्या (नाव काल्पनिक आहे, घटना सत्य आहे) ने संत रामपाल जींकडून दीक्षा घेतलेली आहे. आपल्या तीन मुली तसेच एकुलत्या मुलाला देखील संत रामपाल जींकडून दीक्षा देववली आहे. कौशल्या मलाही एक दिवस सत्संगला घेऊन आली. मला देखील ज्ञान चांगले

वाटले. मी सुद्धा दीक्षा घेतली.

दहा दिवसांपूर्वी शेतात गहू कापणी सुरू होती. कौशल्या आपल्या पतीचे सकाळचे जेवण घेऊन गेली. कौशल्याला पुर्ण दिवस शेतात कापणी करायची होती. इतर दोन मुलांची कुटुंबेही शेतात कापणी करायला गेली होती. सगळे संध्याकाळी येतात. कौशल्येची मधली मुलगी (वय १७ वर्ष) घरचे काम करण्यासाठी घरीच ठेवली होती. माझ्याच मोठ्या मुलाचा लहान मुलगा (वय २० वर्ष) देखील आजाराच्या बहाण्याने घरीच राहिला. दिवसाच्या जवळ जवळ ११.३० वाजता कौशल्येची मुलगी आपल्या घराच्या वरच्या खोलीची (चौबारे) साफसफाई करीत होती. मोठ्या मुलाच्या मुलाने आपल्याच चुलत बहिणीशी दुष्कर्म करण्याच्या हेतूने गच्चीवर जाऊन आतली कडी लावून मुलीला जबरदस्तीने तिच्या तोंडात कपडा भरून हाताला पकडून फरशीवर टाकले.

कौशल्याने आपल्या पतीला म्हटले की माझ्या आत्म्यामध्ये एक विशेष प्रकारची संवेदना उमटत आहे म्हणजे भीती उत्पन्न होत आहे जसे घरात काही चुकीचे घडत आहे. माझे मन पिकाची कापणी करण्यामध्ये लागत नाही. मी घरी जाऊ इच्छिते. पती म्हणाला की कमाल करत आहेस. पीक कापणीसाठी तयार आहे. एक दिवस उशीर झाला तर लोंब्या जमिनीवर पडून जातील. कौशल्या म्हणाली मी लोंब्या उचलून घेईल, परंतु आज घरी अवश्य जाईल. असे म्हणून पतीच्या तीव्र विरोधाला न जुमानता घरी जाण्यासाठी निघाली. परमात्मा कबीर जींची प्रेरणा होती. सरळ घरी गेली. मुलगी खाली भेटली नाही तर वर गच्चीवर जाऊन पाहिले. दरवाजा बंद होता. जोर-जोरात दरवाजा हलविला तर उघडला आणि मुलीची इज्जत वाचली. परमात्मा कबीर जींच्या भक्तीचा चमत्कार आहे. मुलाच्या कुटुंबाला सांगितले तर तेही कौशल्येलाच बरे-वाईट बोलू लागले की तुझी मुलगीच खराब आहे . वर्तमानामध्ये लेकी-सुना जवळच्यांच्याकडून सुरक्षित नाहीत. चारित्र्याचे इतके पतन झाले आहे. मुलगी असणाऱ्यांना ही चिंता खात असते.

संत रामपाल दास जी यांचे सत्संग विचार ऐकल्यानंतर प्रत्येक मानवाची (स्त्री/पुरुष) विचारधारा निर्मळ आणि सामाजिक होते.

मानवतेच्या उत्थानासाठी संत रामपाल जींच्या सत्संगात वारंवार जाणे अनिवार्य आहे. जसे चुकीच्या प्रकारच्या मुलांशी संगत करून मुले वाईट गोष्टी स्वीकारतात. तशाच प्रकारे सदाचारी सत्संगी मुलांशी संगत केल्याने ते वाईटाचा त्याग करून आणि चांगले ग्रहण करतात. सत्संग तर T.V. चॅनेलवर किंवा मोबाईलमध्ये चिपवरून किंवा यूट्यूबवर देखील ऐकू शकता, परंतु सत्संगात गेल्यामुळे सभ्यता, शिष्टाचाराचा स्विकार होतो. सत्संगातील संलग्न जुन्या मुलांना पाहून सत्संगाला येणारी नवीन मुले आपले गैरवर्तन बदलतात.

संत रामपाल जी म्हणतात की जर विद्यालय तसेच विश्वविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनां महिन्याच्या एका रविवारी माझ्या आश्रमात सत्संग ऐकणे बंधनकारक केले तर एका वर्षात विद्यार्थी पाश्चात्य सभ्यतेची वेशभूषा व विचार सोडून देतील आणि स्वदेशी सभ्यतेचे पालन करू लागतील. सर्व वाईटांचा त्याग करतील.

गर्लफ्रेंड तसेच बॉयफ्रेंड रुपी आजार भारताच्या सभ्यतेला लागलेला आहे. त्याचे वेळेवर उपचार समाधान अनिवार्य आहे. याचे समाधान देखिल संत रामपाल दास जींचे विचार पुस्तक आणि सत्संगांची C.D. ऐकून तसेच आश्रमातील सत्संगच्या दिवशी सत्संग ऐकायला येऊन पूर्ण रुपात  होईल.

हरियाणा सरकार संत रामपाल दास जींना सामान्य व्यक्ती तसेच नकली संतांसारखे नकली मानुन खोटे खटले भरुन तुरुंगात टाकते आणि आश्रमाला सील करतात.

सन २०१३ ते २०१७ पर्यंत तीन संतांना तुरुंगात पाठविण्यात आले त्यामध्ये संत रामपाल जी, संत

आसाराम जी तसेच संत गुरमीत सिंह जी. इतर दोन्ही संतांवर बलात्काराचा खटला चालला. त्यांचे आश्रम सील केले गेले नाही. संत रामपाल जींच्यावर असा कोणताही घृणास्पद आरोप नव्हता. त्यांचे सर्व आश्रम सील केले गेले. देशद्रोहाचीही केस बनविण्यात आली.

संत रामपाल जीं कडून दीक्षा घेण्यापूर्वी आम्ही तसेच आमची मुले इतर गुरुंचे शिष्य असूनही पाश्चिमात्य सभ्यतेच्या दलदलीत गुरफटत जात होतो. इतर मुलांना पाहून आमची मुले देखील दिशाहीन होत होती. आम्ही परमात्म्याचे आभार मानतो. संत रामपाल दास जींचे सत्संग विचार आम्हाला ऐकायला मिळाले. आम्ही स्वदेशी सभ्यतेकडे माघारी आलो आहोत आणि सुखी जीवन जगत आहोत.

संत रामपाल जींकडून दीक्षा घेतल्यानंतर आम्ही गुरुजींच्या आज्ञेचे पालन करीत हुंडा देणे-घेणे पूर्णपणे सोडून दिले आहे ज्या चुकीच्या प्रथेमुळे तीन कुटुंबांचा नाश होतो :-

१. ज्या मुलीचा हुंड्यासाठी जीव जातो अशा मुलीचे कुटुंब. त्यांच्याकडे काय शिल्लक उरते, फक्त रडणे, खटल्यांमध्ये पैसा, वेळ आणि शांतता गमावणे.

२. सासरचे कुटुंब.

३. नणंदेचे कुटुंब तुरुंगात जाऊन समुळ नष्ट होतो. संत रामपाल दास जींचे विचार ऐकून व्यक्ती हुंडा घेण्याचा किंवा देण्याचा विचारही करू शकत नाही. सत्संगामध्ये असे नेमकेपणाने समजाविले जाते. विवाहाचे नियम जे अनुयायांनी पालन करायचे असतात :-

हुंडा देणे-घेणे नाही. विवाह सूक्ष्म वेदातील वाणी ''असुर निकंदन रमैणी'' चे उच्चारण करुन १७ मिनिटांमध्ये बॅन्ड-बाज्या शिवाय व डी.जे. न वाजविता संपन्न करण्याचा गुरुजींचा आदेश आहे.

विवाहात कोणतीही वरात जाणार नाही. वरपक्षाचे केवळ ५ ते १५ लोक येतील. वधुपक्षाचे लोक दररोज जे साधे जेवण बनवतात-खातात, तेच जेवण दिले जाते. संत रामपाल जींनी दिलेल्या नियमांचे पालन करीत सुमारे वीस हजार विवाह झाले आहेत. सर्व कुटुंबे सुखी जीवन जगत आहेत. उपरोक्त तीन कुटुंबे उद्ध्वस्तीपासून वाचली आहेत.

## ''चित्रपट पाहण्यास मनाई आहे''

आपली मुले आणि आम्हा सर्वांना गुरुजींचा आदेश आहे की कोणताही चित्रपट व कार्यक्रम ज्यामध्ये अश्लीलतेचे प्रदर्शन असेल, पाहू नये. सामान्य ज्ञान वाढवण्यासाठी डिस्कव्हरी किंवा इतर कार्यक्रम टी.व्ही. वर पाहू किंवा ऐकू शकता. आम्ही तसेच आमची मुले याचे अत्यंत दृढतेने पालन करतो. आमच्या गुरुजींनी भक्तांचे गुप्तचर खाते बनविले आहे ज्याचे अन्य अनुयायांना ज्ञान नाही. ते प्रत्येक अनुयायांवर नजर ठेवतात. जर कोणी चूक केली तर त्याची गुरूजींकडे तक्रार केली जाते. चूक करणाऱ्याला गुरुजी समजावतात की असे केल्यामुळे आपल्यावरील परमात्म्यांचा दया युक्त हात हटेल. हा भक्ती नियम आहे. त्यानंतर तो कधीच चूक करत नाही. इतरांना देखिल भीती असते की आपल्याकडून चूक होऊ नये आणि परमात्म्याची कृपा न मिळो. परमात्म्याची कृपा न मिळाल्यामुळे जीवावर संकटे येतात.

## ''प्रदूषणापासून मुक्ती''

★ संत रामपाल जींचा सक्त आदेश आहे की कोणत्याही सण व आनंदोत्सवाच्या वेळी फटाके उडवायचे नाहीत. प्रदूषणा व्यतिरिक्त कोणताही फायदा होणार नाही अशा मेणबत्ती पेटवू नका.

अशा प्रसंगी सुद्धा दररोजच्या प्रमाणे देशी तुपाची एक ज्योत लावण्याची आज्ञा आहे. आम्ही तसेच आमची

लहान–लहान मुले देखील प्रभु कृपा रहित (नाम खंड) होण्याच्या भीतीने आदेशाचे काटेकोरपणे पालन करतात. त्या दिवशी आम्ही दररोजप्रमाणे परमात्म्याची भक्ती करतो.

★ फाल्गुन म्हणजेच शिमगा तसेच होळीच्या सणाला कोणत्याही प्रकारचे रंग व चिखल व पाणी एकमेकांवर टाकु नका, चाबकांचा खेळ खेळू नका कारण वर्तमानात लोक या बहाण्याने दुश्मनी काढु लागले आहेत. आपसात भांडणे होऊ लागली आहेत. पुर्वीचे लोक सहनशील होते. बलवान होते ते चाबकांचे फटके सहन करत होते. वर्तमानामध्ये धक्का लागून पडल्यामुळे तरुण श्वास घेणे विसरून जातो. यामुळे गुरुजींनी या खेळाला सक्त मनाई केलेली आहे. त्यादिवशी परमात्म्याची स्तुती करतात. ज्या दिवशी भक्त प्रल्हादाचे रक्षण करून परमात्म्याने भक्तांचे मनोबल वाढविले. परमात्म्यावरील विश्वास दृढ झाला आहे.

★ दैनंदिन कामात सोयीस्कर नसल्यामुळे सर्व भक्त तसेच भक्तमतींना जीन्स पॅन्ट घालण्यास मनाई आहे. जे आपल्या संस्कृतीच्या विरुद्ध आहे तसेच अश्लीलतेचा एक भाग आहे. महाविद्यालयात सत्संगला न जाणाऱ्या परिवारातील मुलांची संख्या जास्त असल्याने आपल्या मुलांना अडचणींचा सामना करावा लागतो. तरी देखिल आटोकाट प्रयत्न करून आज्ञेचे पालन केले जाते. जर सर्वच कुटुंबातील मुलांचे संस्कार असे झाले तर लैंगिक अपराध आपोआप समाप्त होतील .

कबीर जींच्या विचारांचा प्रचार करून स्वदेशी–जुनी संस्कृती जागृत केली जाते.

कबीर, परनारी को देखिये, बहन बेटी के भाव।

कह कबीर दुराचार नाश का, यही सहज उपाव।।

भावार्थ :– संत रामपाल दास जी सत्संगात परमात्मा कबीर जींचे विचार सांगतात ज्याचा मानवाच्या मेंदूवर खोलवर परिणाम होतो. वाणीत कबीर जींनी म्हटले आहे की दुसऱ्यांच्या स्त्री तसेच मुलीला आपल्या बहिणी–मुलीच्या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे जेणेकरून मनात कधीही दोष येणार नाही. दुराचार, बलात्कार, व्यभिचार समुळ नष्ट करण्याचा हा सरळ उपाय आहे.

## ''जगण्याचा मार्ग'' पुस्तक

हे पुस्तक संत रामपाल दास जी द्वारा लिहिले आहे. जर हे पुस्तक देशातील विद्यालय, विश्वविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमात एक विषय (**Subject**) ठेवला गेला तर समाजात पसरलेल्या सर्व वाईट गोष्टींचा नाश होईल. स्वदेशी संस्कृती पुनरुज्जीवित होऊन देशातील जनता आनंदाने जीवन जगेल. देशातील जनता परमात्म्याला घाबरणारी, शुभ कर्म करणारी बनेल. लैंगिक अपराध, नशाखोरी, जुगार, चोरी, दरोडे, हुंडा प्रथा, घरातले वाद–विवाद (कुटुंबातील सदस्यांची बाचाबाची) समूळ नष्ट होऊन आपसातील बंधुत्व, एकमेकांचे दुःख वाटून घेणे, परमात्म्याची चर्चा, शिष्टाचाराने व्यवहार करणे मानव समाजाची परंपरा बनेल. आई–वडिलांच्या प्रति मुलांचा बिघडलेला स्वभाव समाप्त होऊन त्यांची सेवा करण्याचे मन होईल. चरित्र निर्माण होईल. पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' मधील काही अंश प्रस्तुत करत आहे:–

पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' मधुन काही तपशील :–

★ सर्वप्रथम भूमिका आहे. भूमिका मधुन स्पष्ट आहे ज्यामध्ये लिहिले आहे. ''जगण्याचा मार्ग पुस्तक घराघरात ठेवण्या योग्य आहे. यास वाचल्याने लोक तसेच परलोक दोघांतही सुखी व्हाल.

★ यानंतर दोन शब्द तसेच पुस्तकातील प्रकरण सुरु होते ज्यामध्ये लिहिले आहे की मानव (स्त्री–पुरुष) उद्दिष्ट काय आहे तसेच भक्ती न केल्यामुळे हानी तसेच भक्ति केल्यामुळे लाभाचे वर्णन प्रभावीपणे लिहिलेले आहे जे

आत्म्याला हादरवुन टाकते. माणूस स्वत: वाईटांचा त्याग करुन परमात्माकडे वळतो.

काही अंश :– वर्तमान जीवनात आपण पाहतो की एखादी व्यक्ती इतकी निर्धन आहे की मुलांचे पालन–पोषण देखील कठिणतेने करत आहे. एक इतका धनी आहे की अनेक कार तसेच बंगले आहेत. एक रिक्षा खेचत आहे. त्यात बसुन एक माणूस जात आहे. एक हवालदार आहे, एक पोलिस प्रमुख D.G.P. आहे. कोणास मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान, न्यायाधीश, डी.सी., आयुक्त तसेच राष्ट्रपतीची पदवी प्राप्त आहे. याचे कारण आहे की ज्याने ज्याने पूर्वीच्या मनुष्य (स्त्री–पुरुष) जन्मात जशी–जशी भक्ती व तप तसेच दान–धर्म, शुभ कर्म तसेच पाप व अशुभ कर्म केले होते, त्यांच्या परिणामस्वरुप वरील स्थिती प्राप्त आहे.

जर वर्तमान मानव जीवनामध्ये सत्य भक्ति तसेच शुभ कर्म केली नाहीत तर सर्व मानव पुढच्या जन्मामध्ये पशु–पक्षी इत्यादी–इत्यादींचे जीवन प्राप्त करुन महाकष्ट भोगतील. जशी इन्व्हर्टरची बॅटरी चार्ज करुन ठेवली आहे. चार्जर काढला आहे. बॅटरी कार्यरत आहे. सर्व सुविधा (पंखा चालू आहे, बल्ब, ट्यूब चालु आहेत) प्राप्त आहे. चार्जर न लावल्यामुळे बॅटरी डिस्चार्ज होऊन जाते. सर्व सुविधा बंद होतात. जसे पंखा चालणे, बल्ब पेटणे, कॉम्प्युटर चालणे बंद होऊन जाते. बॅटरीला पुन्हा चार्जर लावून चार्ज केल्यामुळे काम करेल. याच प्रकारे पूर्व जन्मामध्ये आत्म्याला भक्तीने जितके चार्ज केलेले आहे, त्याच्या अनुसार सुविधा प्राप्त होतात.

★ राजे लोक देखिल संकट वेळी परमात्म्याकडूनच संकट निवारणाच्या इच्छेने साधू–संतांकडून आशीर्वाद प्राप्त करून सुखी होतात. सामान्य व्यक्तींना देखिल परमात्म्याची भक्ती करुन सुखी व्हायला पाहिजे.

★ दोन मित्र होते. एकाचे नाव 'क', दुसऱ्याचे नाव 'ख' होते. (काल्पनिक नाव) क ने सत्संग आणि परमात्म्याकडे वळला. सर्व वाईटांचा त्याग केला. त्यात झालेला परिवर्तन पाहून कुटुंबातील इतर सदस्यांनीही भक्ती सुरू केली. घर स्वर्ग बनले. ख ला क ने खूप समजाविले की सत्संग ऐकण्यासाठी चल, कल्याण होईल. तो वारंवार बहाणा करायचा, की मुले लहान आहेत. यांचे पालन–पोषण करायचे आहे. मला कामातून सवड (Time) नाही आहे. तुझे तर डोके फिरले आहे. जेव्हा पहावे तेव्हा सतगुरू आणि सत्संगाच्या गोष्टी करतो. काही कामधंदा देखिल करत जा. काही दिवसांनंतर ख चे तरुण अवस्थेत हृदयविकाराने (३५ वर्ष वय) मृत्यू झाला. सर्व सोडून निघून गेला. कायमची सवड मिळाली. जर परमात्म्याची भक्ती देखिल केली असती, धंदा देखिल केला असता तर परमात्म्याने रक्षण केले असते.

वेदांमध्ये देखिल प्रमाण आहे की परमात्मा आपल्या भक्तांचे संकट निवारण करतो. जरी मृत्यू देखिल आला, तरी त्याला टाळून जिवंत करून शंभर वर्षांचे जीवन प्रदान करतो. (ऋग्वेद मंडल १० सूक्त १६१ मंत्र २ मध्ये प्रमाण आहे.)

विचार करण्याची गोष्ट आहे की परमात्म्याची भक्ती यासाठी केली जाते की साधकाच्या जीवन मार्गामध्ये पापांमुळे, काही काटे किंवा खड्डे असतील तर परमात्मा पापांचा नाश करून पापरुपी काटे काढुन मार्गातील खड्डे भरुन मार्ग सुगम करतात. यजुर्वेद अध्याय ८ मंत्र १३ मध्ये लिहिले आहे की परमात्मा साधकाचे पूर्व जन्मात केलेले पाप तसेच या जन्मात केलेल्या सर्व पापांचा नाश करून सुखी करतो. सूक्ष्मवेदात लिहीले आहे :–

कबीर, जब ही सतनाम हृदय धरो, भयो पाप को नाश।
जैसे चिंगारी अग्नि की, पडै पुराने घास।।

भावार्थ :–कबीर जींनी पाचव्या वेदामध्ये म्हटले आहे की शास्त्र विधी अनुसार खऱ्या नामाचे मनाने स्मरण केल्याने साधकाची सर्व पापे अशी नष्ट होऊन जातात जसे जुन्या सुकलेल्या गवताच्या गंजीला (ढिगाला) अग्नीची

ठिणगी पडल्यावर जळून भस्म होऊन जाते.

पापांमुळे दु:ख होते. पाप नष्ट झाल्यामुळे स्वतः सुखी होऊन जातो

पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' वाचल्यामुळे आत्म्याला अध्यात्माचे संपूर्ण ज्ञान होते. स्वभाव बदलेल. माणुसकी (मानवता) पुन्हा वाढीस लागेल. पापांना घाबरशील, शुभ कर्म करशील. अशी-अशी अनेक हृदयाला स्पर्श करणारी प्रकरणे पुस्तकात खुप आहेत.

## ''विवाह कसा करावा'' तसेच ''विवाहा नंतरची यात्रा''

पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' मध्ये सांगितले गेले आहे की वर्तमानात मुलांना चांगले विचार नाही मिळत. जे वयस्कर व्यक्ती युवकांना तसेच मुलांना काही कारणाने आपल्याजवळ बसवत असत. दोन-तीन वयस्कर आपापसात चर्चा करत असत की भाऊ! त्या गावांमध्ये एक वाईट घटना घडली आहे. दुसरा विचारतो की असे काय झाले? असे ऐकले आहे की गावात एका मुलाने एका मुलीची छेड काढली. मुलीकडच्यांनी मुलाला मारहाण केली. कारण न जाणताच मुलाकडच्यांनी मुलीवाल्यांसोबत भांडण केले. मुलाकडील दोन व्यक्ती मेल्या, मुलीकडील एक मेला. दोन्ही पक्षातील कित्येक व्यक्ती जखमी झाल्या. तिसरा वृद्ध म्हणत होता की हे भाऊ! कसा कुपुत्र जन्माला आला. तीन माणसे खाल्ली. अशा पुत्रापेक्षा निपुत्रिक राहीलेले बरे. कसा खोटा जमाना आला. मुलाने अन्याय केला. आपल्या गावाच्या इज्ज़तीशी खेळत होता. असे कर्म कोणीही मुलाने करु नये.

त्यांच्या जवळ बसून ऐकत असलेल्या मुलांवर त्यांच्या बोलण्याचा असा प्रभाव पडत होता की तरूण मुले इतरांना देखिल ही घटना सांगुन अशी चुक न करण्याची प्रेरणा करतील आणि स्वतः देखिल कोणा बहीण-मुलीकडे डोळे वर करुन पाहणार नाहीत.

''जगण्याचा मार्ग'' पुस्तकातुन ज्येष्ठांचे शिक्षण मिळते. यास वाचल्यानंतर कोणी व्यक्ती दुराचार (बलात्कार) व छेडछाड करणे तर दुरची गोष्ट आहे, विचार देखिल करणार नाही. हे पुस्तक नि:शुल्क प्राप्त करण्यासाठी खाली दिलेल्या संपर्क क्रमांकावर पुर्ण पता SMS करा, पुस्तक आपल्या घरी पोहोचेल. पोस्ट खर्च देखिल लागणार नाही.

★ विवाह कसा करावा :- या विषयास पुस्तकामध्ये वाचण्यामुळे आत्म्याला असा झटका बसतो ज्याने ''ऑनरकिलींग'' चा त्रास कायमचा संपून जाईल.

प्रेम विवाहाबद्दल सांगीतले आहे की = आपल्या गोत्रात करु नये. आपल्याच गावात करू नये तसेच प्रतिबंधित गोत्र तसेच प्रतिबंधित विवाह क्षेत्रात करु नये. लग्नाचा विषय आई-वडिलांवरच सोपवणे जास्त चांगले आहे. प्रेम विवाहाने नुकसान तसेच सामाजिक संमतीने केल्या गेलेल्या विवाहाच्या लाभाचे हृदयस्पर्शि मुद्देसुद विवरण सांगितले आहे जे वाचल्यानंतर तरुण वर्ग ही चुक कधीच करणार नाही. समाजात शांती राहील. ऑनरकिलींग समाप्त होईल. खटलेबाजी देखिल समाप्त होईल.

★ मुलीला आपल्या पसंतीचा जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य कायम राहिले आहे. परंतु प्रेम विवाहाचा रोग नव्हता. एखादे-दुसरे प्रमाण कोण्या युगात मिळते. जसे हीर-रांझा, परंतु या जोड्या कधीही सुखी राहील्या नाहीत. विवाह तर सुखाने जीवन जगण्यासाठी व आपला वंश वाढविण्यासाठी केला जातो.

★ आपल्या पसंतीचा वर निवडण्याचे स्वातंत्र्य वर्तमानात देखिल आहे. मुलीला मुलगा दाखविला जातो. दाखविला पाहिजे. दोघांनी स्वखुशीने होकार द्यावा. मुला-मुलींना हवे की आई-वडीलांवर विश्वास ठेवावा. ते आई-वडील कधीही आपल्या मुलांना दु:खी पाहू इच्छित नाहीत. त्यामुळे ते आपल्या मुलीचे नाते योग्य ठिकाण व

मुलाबरोबर करतात. अंतरजातीय विवाह करू शकतात. आपला नारा आहे :–

जीव हमारी जाति है, मानव धर्म हमारा। हिन्दु मुस्लिम सिक्ख ईसाई, धर्म नहीं कोई न्यारा ।।

भावार्थ :– प्राण्याची जात जीव आहे कारण मानव, देवता तसेच अन्य पशु–पक्षी सर्व जंतु जीव आहेत. ही आपली जात आहे. मानव श्रेणीचे जीव असल्याकारणाने मानवता हा आपला धर्म आहे म्हणजेच परमात्माने मानवाला समज दिली आहे. त्याने शुभ कर्म केले पाहिजेत. पशु–पक्ष्यांप्रमाणे एक दुसऱ्याचे हिसकावुन, दुर्बलांना मारुन आपला स्वार्थ साधायला नको. एक–दुसऱ्याला सहयोग केला पाहिजे. हा आपला धर्म आहे. विश्वात जेवढे धर्म आहेत, सर्वात मानव आहेत. अन्य कोणत्याही प्राण्यात नाही. यासाठी आपल्या सर्वांना मानव धर्माचे पालन करायला हवे. एका परमपित्याची आपण सर्व मुले आहोत.

★ इतर धर्मांत देखिल विवाह करू शकता. अशा प्रकारची अनेक प्रकरणे तसेच सल्ले ''जगण्याचा मार्ग'' पुस्तकामध्ये लिहिलेले आहेत जे वाचल्यामुळे अधिक आनंद व समज येईल.

## ''चरित्र निर्माण''

''जगण्याचा मार्ग'' पुस्तकामध्ये अनेक कथा तसेच उदाहरण दिले आहेत ज्यास वाचुन स्त्री–पुरुष, तरूण मुले–मुली कधी चरित्रहनन करु शकत नाही. त्यांना समजेल की चरित्र किती मौल्यवान आहे. चरित्रहीन स्त्री–पुरुषाला कोणत्याही समाजात सम्मान मिळत नाही.

''जगण्याचा मार्ग'' पुस्तकामध्ये लिहिले आहे की :–

एका चरित्रवान पुरुषाची परिक्षा घेण्यासाठी एका राजाने एक सुंदर तरुण स्त्रीला रात्री पाठविले. स्त्री त्या महापुरुषाच्या अंथरुणावर बसली. तो उभा राहिला व म्हणाला, हे बहिण! हे मुली! आपण बाहेर जा. आपण आपल्या कुळाच्या इज्जतीकडे पहा. आपल्या आई–वडिलांच्या इज्जतीकडे पहा. आपण चरित्रहिन होण्याची बातमी ऐकून ते समाजात तोंड दाखवण्यायोग्य राहणार नाहीत.

देशाचा राजा देखिल दु:खी होईल की माझी प्रजारूपी कन्या चरित्रहिन कशी झाली? (राजा प्रजेचा पिता असतो. तो इच्छीतो की प्रजाजनांकडुन अशी चुक होऊ नये की राज्यामध्ये उत्पात माजेल) तरीसुद्धा ती स्त्री त्या कक्षातुन बाहेर गेली नाही तर तो महापुरूष स्वतः बाहेर निघून गेला. मग ती स्त्री देखिल निघुन गेली. सकाळी स्त्रीने राजाला सांगितले की राजन! तो परम जति पुरुष आहे.

★ चरित्रवान मुलीची कथा :– थोडक्यात लिहतो, पुस्तकात सविस्तर वाचाल तर अंगावर शहारे येतील.

जुन्या काळातील एका जवानाने आपल्या सहकाऱ्यांमध्ये आपल्या चरित्रवान पत्नीबद्धल वारंवार चर्चा केली. एका मंत्र्यापर्यंत गोष्ट गेली. त्याला ईर्ष्या झाली. राजाकडून परीक्षा घेण्याची आज्ञा घेऊन जवानाच्या पत्नीचा धर्म नष्ट करण्यासाठी गेला. अट अशी होती की पत्नी जर चरित्रवान नसेल तर जवानाला फाशी होईल. जर चरित्रवान असेल तर तो मंत्री जो परीक्षा मध्ये नापास होऊन येईल, त्याला फाशी लागेल. अट ही होती की काही अशी खुण स्त्रीच्या शरीराची सांगावी लागेल ज्याने विश्वास होईल तसेच लग्नाच्या वेळचे उपवस्त्र (उपरणं) तसेच कट्यार म्हणजे तलवार (दोन्ही वस्तु रिवाजाप्रमाणे लग्नात मिळत असत ज्यास पत्नी कधीही कुणा पर पुरूषाला देत नसे) आणायचे आहेत.

तिथे जाऊन मंत्र्याला समजले की स्त्री वास्तवात चरित्रवान आहे. त्याने एक दुती म्हणजे गुप्तहेर स्त्रीला पैशाचे आमिष दिले. ती जवानाच्या घरी पतीची आत्या बनुन गेली. नविन लग्न झाले होते. स्त्रीने ऐकले होते की पतीला आत्या आहे, परंतु ना नावाचा पत्ता होता, ना गावाचा. त्या दुतीने स्नानाच्या वेळी जवानाच्या पत्नीच्या

जांघेत गुप्तांगाजवळ डाव्या बाजूला काळा तीळ पाहिला. उपरणं-कट्यार चोरून मंत्र्याला दिले तसेच निशानी सांगितली. सभेमध्ये मंत्र्याने राजाला निशानी सांगितली आणि दोन्ही वस्तु दाखवल्या तर जवानाने मानले की सर्व गोष्टी बरोबर आहेत. जवानाला फाशीची शिक्षा सुनावली. जवानाने अंतिम इच्छेमध्ये सांगितले की मी माझ्या पत्नीला भेटु इच्छितो. आज्ञा मिळवुन घरी गेला. आपल्या पत्नीला सांगितले की तुझ्यामुळे मला १५ दिवसांनी फाशी लागेल. तु मंत्र्याबरोबर चुकीचे काम केलेस आणि उपरणं-कट्यार दिलीस. माझ्या कुळाला कलंक लावलास. जवानाच्या पतीव्रता पत्नीने सर्व गोष्ट सांगितली. जवान परत गेला. मागे-मागे ती मुलगी एका नर्तकीचे सोंग करायला गेली. राजाला नृत्य दाखवण्याची आज्ञा घेतली. सभा बोलावली. तो मंत्री देखिल तिथेच होता. त्याचे नाव शेरखान होते. मुलीच्या नृत्याने राजा खुप प्रसन्न झाला. मुलीला म्हणाला की माग काय मागतेस? मुलगी म्हणाली वचनबध्द व्हा. राजा म्हणाला राज्य सोडून काही पण माग.

मुलीने मागितले की आपल्या सभेतील शेरखान नावाच्या व्यक्तीने माझ्या घरातुन काही चोरून आणले आहे. त्याला फाशीची शिक्षा द्यावी. राजाने शेरखानला तिच्या समोर उभे केले आणि म्हटले की सांग शेरखान! या मुलीची काय वस्तु चोरुन आणली आहे? शेरखान म्हणाला, हे राजन! ही स्त्री खोटे बोलत आहे. मी जीवनात कधीही हिचा चेहराही पाहिला नाही.

मुलीने म्हटले कि तु जर माझा चेहराही पाहीला नाही तर तु उपरणं व कट्यार कोठुन आणली? मी त्या जवानाची पतीव्रता पत्नी आहे ज्याला तुझ्या खोट्यामुळे तीन दिवसांनंतर फाशीचा आदेश आहे. त्याच वेळी न्यायकरी राजाला सर्व प्रकरण लक्षात आले. मुलीने सांगितले की याने एक बदमाश वृद्धा पाठवली होती जी माझ्या पतीची आत्या बनुन दोन दिवस घरात राहीली होती. तिने माझी कंबर चोळण्याचा बहाण्याने वाकुन माझ्या जांघेतील तीळ पाहीला आणि उपरणं-कट्यार चोरुन नेली होती.

राजाने जवानाला बोलावले आणि शिक्षा माफ केली. अर्धे राज्य देखिल दिले. शेरखानला फाशी लागली. (धन्य आहेत अशा मुली ज्यांच्यावर अभिमान आहे भारताला.)

## ''वडीलांचे कर्तव्य''

''जगण्याचा मार्ग'' पुस्तकामध्ये एक अशी कथा आहे ज्यामध्ये सांगितले आहे की :-

वडीलांचा मुलांविषयी कसा भाव असावा? सत्संग ऐकण्याच्या अगोदर सुन आपल्या सासऱ्याची सेवा करत नव्हती. वाळलेल्या भाकरी द्यायची. सत्संग विचार ऐकल्यानंतर सुन देखिल आपल्या सासऱ्याची सेवा करू लागली. (सासुचा मृत्यू झाला होता) मुलगा देखिल नालायक होता, त्याच्यात सुधारणा झाली. घराचे स्वर्ग झाले.

ही कथा वाचून सुना आपल्या सासु-सासऱ्याची सेवा आई-वडिलांप्रमाणे करतील. मुले देखिल आज्ञाधारी होतील. घर स्वर्ग बनुन जाईल.

## ''मुलगा तसेच मुली मध्ये अंतर समजु नये''

''जगण्याचा मार्ग'' पुस्तकामध्ये हा प्रसंग असा आहे जो वाचल्यानंतर मुलगा तसेच मुलगी यातील भेद भावाची दुर्बुद्धी नेहमीसाठी समाप्त होऊन जाते. ज्या कारणाने मुलींच्या गर्भामध्ये होणाऱ्या हत्येला पुर्ण विराम लागेल.

## ''पुत्र प्राप्त न झाल्यामुळे दु:खी दांपत्याला विशेष हिम्मत मिळेल''

''जगण्याचा मार्ग'' पुस्तकामध्ये हा प्रसंग असा तर्कशुद्ध आहे की जे पती-पत्नी अपत्य न होण्याच्या कारणाने आपले आपल्याला कुप्रथेमुळे समाजापासून वेगळे-अलिप्त जाणतात, त्यांच्या विषयी असे उदाहरण दिले आहे ज्यास वाचुन नि:संतान दांम्पत्य संतान वाल्यांपेक्षा श्रेष्ठ समजतील.

## ''मानव नशिली वस्तू सोडून देईल''

पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' मध्ये शास्त्र तसेच संतांच्या वाणीच्या तर्कानुसार तसेच प्रमाणानुसार नशाविरोधी विषयामध्ये लिहिले आहे ज्यास वाचुन कोणी महामूर्खच भविष्यामध्ये तम्बाखु, सुल्फा, दारूची नशा करेल. ९९% पाठक नशेचे व्यसन सोडतील.

## ''घरातील कलह समाप्त होतात''

पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' मध्ये असा उल्लेख आहे ज्याला वाचण्याने-ऐकण्याने परिवारातील आप-आपसातील तू-तू मी-मी समाप्त होऊन प्रेमाने जीवन जगतात.

संक्षिप्त मध्ये :- सासू लहान-लहान गोष्टींना घेऊन भांडण करत असत. जर सुनेकडून काही नुकसान झाली तर संपुर्ण दिवस त्याच गोष्टीला पकडून कुरबुर करत असत. आपल्या मुलाला देखिल खरे खोटे सांगून मारायला लावत असत. एक दिवस आपल्या बहिणीकडून अधिक आग्रह केल्याने सासू सत्संग ऐकायला गेली. सत्संगामध्ये सांगितले गेले होते की कोणी घरातील सदस्य हानी करण्याची इच्छा ठेवत नाही, परंतु कर्मामध्ये जे नुकसान परमेश्वराने लिहले आहे, ती होणारच. घरातील कोण्या सदस्याकडून कोणते नुकसान झाले तर त्याच्यासोबत भांडण केले नाही पाहिजे. नुकसान तर झालेलेच आहे, भांडण केल्याने ते नुकसान तर भरून निघणार नाही, उलट मानसिक शांती देखिल समाप्त होते. जगण्याचा मार्ग सत्संगानेच समजला जातो. सासु सत्संग ऐकून घरी आली. एक दिवस सकाळी सुनेने म्हशीचे दूध काढून छताला लटकत असलेल्या कुंडीच्या हुकाला दुधाची बादली टांगली तर चुकुन ती बादली व्यवस्थित अडकली नाही. त्या बादलीत जवळ जवळ पाच लिटर दूध होते, जमिनीवर सांडले. सर्व दूध पसरले. सून आपल्या सासूबाई कडे घाबरलेल्या नजरेने पाहू लागली. ती सासुबाईच्या तोंडाकडे पाहत होती की आता ही काय आग ओकेल? सासुबाई वर सत्संगामध्ये ऐकलेल्या विचारांचा विशेष प्रभाव पडला होता. म्हणाली, मुली? हे दूध आज आपल्या नशिबात नव्हते. तुझा काहीच दोष नाही. या दुधाला वरवरच्या हाताने उचलून बादलीत घे व म्हशीला पाज. सुनेला आपल्या कानावर विश्वास होत नव्हता की सासुबाईच हे प्रेमळ शब्द बोलत होती. त्यानंतर ते घर जे नरक बनले होते, स्वर्ग बनले.

★ पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' मध्ये अद्वितीय दिव्य अध्यात्म ज्ञान आहे जे सर्व धर्माच्या शास्त्रांमध्ये प्रमाणित आहे.

जसे गीता अध्याय १६ श्लोक २३-२४ मध्ये म्हटले आहे :-

जे साधक शास्त्रविधीला त्यागून आपल्या इच्छेने मनमानी आचरण करतात म्हणजे जे भक्ती चे मंत्र व यज्ञ इत्यादी शास्त्रांमध्ये लिहिलेले नाही, त्यांचा जाप व यज्ञ करतात. त्यांना ना सुखाची प्राप्ती होते, ना सिद्धी म्हणजे भक्तीची शक्ती जे सर्व कार्य सिद्ध करत असते तसेच ना त्यांची गती म्हणजे जन्म-मरणातून मुक्ती प्राप्त होते अर्थात अशी साधना व भक्ती ने अनमोल मानव जीवन नष्ट होऊन जाते. (गीता अध्याय १६ श्लोक २३)

श्रीमद्भगवत गीता अध्याय १६ श्लोक २४ मध्ये म्हटले आहे की याने तुझ्यासाठी कर्तव्य म्हणजे जी भक्ती

व साधना कर्म करायला हवे तसेच जे अकर्तव्य म्हणजे केले नाही पाहिजे, यासाठी शास्त्रच प्रमाण आहेत. (गीता अध्याय १६ श्लोक २४)

संत रामपाल दास जी द्वारा सांगितलेले सर्व ज्ञान तसेच सर्व साधना व भक्तीचे ज्ञान शास्त्रोक्त आहे.

हेच कारण आहे की संत रामपाल दास जीं च्या साधकाला परमात्मा च्या भक्ती चे सर्व लाभ मिळत आहेत जे वरती गीताच्या श्लोकांमध्ये सांगितले आहे जे शास्त्रविरुद्ध साधकांना मिळत नाहीत. ज्या कारणाने यांच्या शिष्यांच्या संख्यामध्ये अद्वितीय वाढ होत आहे. अशा प्रकारची आणखी पुस्तके देखिल आहेत :- ज्ञान गंगा, अंध श्रद्धा भक्ती खतरा-ए-जान, गीता तुझे ज्ञान अमृत, गरिमा गिता की, भक्ती पासून परमेश्वर पर्यंत. संत रामपाल जींच्या विचाराने मानव समाजात सुधारणा येईल. बिघडलेल्या मानवतेचा उद्धार होईल. देशाची मुले-मुली आपल्या संस्कृतीवर परत येतील. भारत देशात सुख शांती होईल. सर्वजण मिळून एक-दुसऱ्याचे दुःख वाटतील. सुखमय जीवन जगतील. बलात्कार व लैंगिक क्षळाच्या घटना समूळ नष्ट होतील.

रेप (बलात्कार), लैंगिक क्षळाला रोखण्यासाठी भारत सरकार तसेच राज्य सरकारने देखिल कडक कायदे बनवले आहेत. मृत्यू तसेच आजीवन कारावासापर्यंत प्रावधान केले आहे. चांगली गोष्ट आहे. कायदा देखिल काम करतो, परंतु वाटत नाही की कडक नियमाने लैंगिक अपराध कमी होतील. हा एक सरकारचा जनतेला शांत करण्याचा उपाय आहे. जसे हत्याच्या अपराधीला मृत्यु तसेच आजीवन कारागृहाच्या शिक्षेचे प्रावधान आहे, परंतु प्रतिवर्ष हत्याचे अपराध वाढत आहे. आमचे म्हणणे आहे की कायदा कमजोर वर्गावरच लागू होतो कारण मोठे लोक कायद्याच्या शिकंजातून वाचतात. मुकदमा दाखल देखिल होत नाही. असे अपराध त्या मोठ्या लोकांची मुले करतात. कायद्यापेक्षा अधिक भीती समाजाची असते. समाजाच्या भीतीने देखिल व्यक्ती चुकीच्या वागण्याला घाबरतो कारण त्याला माहिती असते तुला समाजात राहायचे आहे. सत्संगाच्या अभावानेच मानव समाजामध्ये धार्मिक विचारांची कमतरता होत आहे. जे आज तरुण आहेत, तेच वृद्ध होऊन मोठे-म्हातारे म्हणवले जातील. त्यांच्याजवळ देखिल अध्यात्मिक विचार नसतील तर ते मुलांना काय शिक्षवण देतील. परंतु जेव्हा मानव (स्त्री-पुरुषाला) परमात्माच्या विधानाचे ज्ञान होईल, तेव्हा तो सर्व पापातून वाचेल. अपराध करणे विष (Poision) खाण्याच्या बरोबर समजेल. ते संत रामपाल दास जी महाराजांच्या सत्संगातून होऊ शकते. सत्संगाच्या माध्यमातून चांगले विचार जनतेला ऐकायला मिळतील तर या समस्याचे समाधान पूर्ण रुपाने होईल. संत रामपाल दास जी महाराजांद्वारा देत असलेल्या सत्संग-विचाराच्या वचनाचे जादूई प्रभाव पडतो.

## ''आई-वडिलांच्या प्रती सेवा तसेच सन्मानामध्ये कमतरता''

वर्तमानामध्ये प्रत्येक व्यक्तीची प्रबळ इच्छा आहे की आपल्या मुला-मुलींना उच्च शिक्षण द्या. मुलांना चांगला रोजगार मिळावा. मुले ज्यांच्या नशिबात परमात्माने लिहिले आहे, ते प्राप्त करतात. उच्च सरकारी पद, चांगला व्यवहार करतात, धनी होतात. परंतु अध्यात्म ज्ञानाशिवाय आई-वडिलांच्या विषयी तो भाव राहत नाही ज्याची मुलांकडून अपेक्षा केली जाते. त्यांना प्रेमाच्या ठिकाणी उर्मट व्यवहारच मिळतो. मुलगा चांगला असेल तर सुनेमध्ये चांगले संस्कार नसल्याने घरामध्ये भांडणाचा नाच होणे स्वभाविक आहे. या अनुभवाच्या सोबत प्रॅक्टिकली देखिल प्रमाणित आहे की वर्तमानामध्ये वृद्धाचे जीवन नरक झाले आहे. मुलगी सासरी जाते. मुलावर अवलंबून राहावे लागते. मुलगा व सुन जर चांगले आहेत आणि नोकरीच्या निमित्ताने दूर स्थानी जावे लागते. ही मजबूरी तसेच जरुरी आहे. माता-पिता अनाथ आहेत. वृद्ध अवस्थेमध्ये परिवाराच्या सेवेची आवश्यकता असते. ते शक्य नाही. जर मुलांना संत रामपाल दासजींचे सत्संग ऐकायला मिळतील तर त्यांच्यात शिष्टाचाराची भावना निर्माण होईल. दया भाव उत्पन्न होतो. जेव्हा वृद्ध देखिल सत्संगात जातील तर आपल्याला एकटे समजणार नाहीत कारण की

सत्संगात सेवादार त्यांना आपल्यासारखे प्रेम व सन्मान देतात. त्यांची सेवा करतात. त्यांचे जीवन सुखाने व्यतीत होते. मुलांचे कामानिमित्त जवळ किंवा दूर जाणे देखिल अनिवार्य आहे. माता-पिता म्हणजे वृद्धांना आधाराची अति आवश्यकता असते. संत रामपाल दास गुरु जी अशी व्यवस्था करू इच्छितात की धरती स्वर्ग बनावे. वर्तमानात जे उच्च पदावरुन निवृत्त अधिकारी किंवा व्यापारी (वृद्ध स्त्री-पुरुष) शहरांमध्ये पार्कमध्ये फिरत असतात किंवा तिथे बसून काही वेळ घालवितात आणि वर्तमान स्थितीतील चर्चा करतात. नंतर शेवटी आप-आपल्या मुलांची न पाहू शकणारी चर्चा भीत-भीत करतात. कोणी मुलगा-सूनेचे गुणगान करतो, तर कोणी गाऱ्हाणे सांगतो. काहीही होत नाही, मनाचे ओझे हलके करु इच्छितात. काही दिवसात तीच गोष्ट मुलगा-सूनेला (निकामी) सांगणारे असतात, मुलगा-सुनेला याची माहिती **SMS** अवश्य होते. वृद्धांना मग अजुन जास्त बरे-वाईट ऐकण्यास मिळते. संत रामपाल दास जींचा उद्देश आहे की प्रत्येक गाव व शहरांमध्ये विशाल सत्संग स्थळ बनवावे जिथे दर शनिवार-रविवारी संत रामपाल दास जींचे सत्संग **D.V.D.** च्या माध्यमातुन **LED** वर चालवावे. भोजन-भंडाऱ्याचे आयोजन केले जावे. गाव व शहरातील ते वृद्ध ज्यांची मुले दुर किंवा जवळ रोजी-रोटीसाठी गेले आहेत, आपल्याला एकटे तसेच असह्य समजू नये. मुले-सूनेची निंदा करण्याऐवजी परमात्म्याची चर्चा करा.

जे वृद्धजन आश्रमात राहू इच्छितात, त्यांनी रहावे. त्यांची सेवा आश्रमाचे सेवादार करतील. त्यांना परमात्माच्या विधानाचे ज्ञान असते. ते सर्वांना आपले मानतात. त्या वयात (वृद्धावस्थेत) त्या वरिष्ठ नागरिकांना देखिल समजते कि आपले कोण आहे कारण सत्संगामध्ये हाच निर्णय मिळतो. अशाप्रकारे मानव जीवन सरल होऊन आपापसातील प्रेम व भाईचारा वाढतो. धरती स्वर्ग बनेल.

आम्ही केवळ इतके इच्छितो की संत रामपाल दास जींच्या सत्संग वचन तसेच व अन्य संताद्वारे सांगितलेली सत्संग वचनाची शहानिशा शास्त्रानुसार करून न्यायालयाने निर्णय करावा की कोणाचे प्रवचन किंवा पुस्तकाचे लेख प्रमाणित आहेत? कोणाची साधना शास्त्रविधी अनुसार आहे. केवळ त्यांच्याच प्रचाराची आज्ञा द्यावी. त्यांच्या समोर आलेल्या अडथळ्याचे समाधान व्हावे. हे जनहिताचे कार्य आहे.

जो बलात्कार **(Rape)** तसेच लैंगिक क्षळाच्या घटना जे बातम्यांमध्ये ऐकायला मिळतात, ते तर एकुण अपराधाच्या दहा टक्के आहेत कारण ९०% तर आपली इज्जत खराब होण्याच्या भीतीने तसेच गुंडाच्या भीतीने कोणाला सांगत नाहीत. आजीवन गुदमरून मरायला विवश आहेत. या वाईट अपराधावर अंकुश सत्य अध्यात्म ज्ञानाने लागू शकते. वर्तमानात प्रवचन करणारे धार्मिक गुरुंची लाट आली आहे. दुसरीकडे अपराधांमध्ये देखिल अद्वितीय वाढ होत आहे. याचे कारण हे आहे की संत रामपाल दासांच्या अतिरिक्त कोणत्याही गुरूचे ज्ञान तसेच भक्ती मंत्र शास्त्रांच्या अनुसार नाहीत. ज्या कारणाने श्रोत्यांवर स्थाई प्रभाव पडत नाही.

संत रामपाल जी चे प्रवचन कठोर ह्रदयाला मुलायम बनवितात. श्रोत्यांना विवश होऊन आपल्या कर्मावर विचार करावा लागतो. आम्ही हे देखिल विकल्प सांगू इच्छितो की साधना टी.व्ही. चॅनेलवर सन् २०१२ मध्ये सर्व संतांचे विचार संत रामपाल दास जी द्वारा विवेचन केलेले चालविले होते. त्यांची **D.V.D.'s** बनवून ठेवली आहे. माननीय न्यायालय सहजतेने निश्चित करू शकते की कोण चुकीचा, कोण योग्य ज्ञानाचा प्रचार करत आहे कारण **D.V.D's** मध्ये सर्व शास्त्रांना दाखवले गेले आहे. त्या सत्संगाचे **Title** आहे ''अध्यात्मिक ज्ञान चर्चा संत रामपाल **V/s** अन्य गुरुजन''. संत रामपाल दास जी चे विचार तसेच अन्य संतांचे (गुरु) विचार दोघांचे मिळून बनविलेली **D.V.D's** आहे ज्या हातो-हात खरेपणा देतात.

**सत्संगांचा व्हिडिओ व पुस्तक नि:शुल्क Download करू शकता Website :-**
**www.jagatgururampalji.org वर.**

नोट :– पुस्तक ''जगण्याचा मार्ग'' नि:शुल्क मागवण्यासाठी खालील नंबर वरती आपले नाव, पूर्ण पत्ता SMS करा. पोस्ट खर्च देखिल पण आपल्याला द्यायचा नाही. पुस्तक आपल्या घरी नि:शुल्क पाठविले जाईल:–

**SMS TO :- 7027000825, 7027000826, 7027000827**

**For WhatsApp :- 9992600893**

संत रामपाल दास जी च्या आदेशाने ''कबीर मानव कल्याण समिति'' बनविली आहे. हे बनविण्याचे कारण तसेच त्याच्या कार्याची माहिती जनतेला देण्यासाठी पत्रक तयार केले आहे जे खालीलप्रमाणे आहे.:–

## असे मरण ना मरावे कोणी

मानव समाजास निवेदन :–

आम्ही संत रामपाल दास महाराजींचे शिष्य आपल्या गुरुजींच्या आदेशाने मानव समाजाची काही सेवा तसेच समाजातून कुप्रथा आणि बुराई समाप्त करण्यासाठी इच्छुक आहोत. आम्ही सर्वजण मिळून गरीब (निर्धन) व्यक्तींची मदत करू इच्छितो. छत्तीस बिरादरी मध्ये कोणी देखिल व्यक्ती निर्धनाच्या कारणाने आत्महत्या करू नये. आम्ही अशी योजना बनवली आहे आमचे गुरुदेव संत रामपाल दास जींनी दिनांक २८ एप्रिल २०१८ च्या एका समाचार पत्रामध्ये एक दु:खद बातमी वाचली ज्यामध्ये लिहिले होते की एक व्यक्ती टी.बी. च्या आजाराने ग्रस्त होता. चार मुली तसेच एक सर्वात छोटा मुलगा होता. चाळीस वर्षाच्या व्यक्तीने आपल्या तीन मुलींना (एक चार वर्षाची, दुसरी सात वर्षाची तसेच तिसरी अकरा वर्षाची) भावाच्या मोटरसाईकलवर बसवून नदीवर घेऊन गेला. त्या तिघींना विष देऊन नदीत टाकले. स्वत देखिल विष खाऊन नदीमध्ये पडला. चौघांचा मृत्यू झाला. आत्महत्या तसेच हत्या करण्याच्या अगोदर भावाला फोन करून सूचना दिली. एक मुलगी सर्वात मोठी तसेच एकलोता मुलगा पत्नीच्या भरोश्यावर सोडून गेला.

तिन्ही मासूम मुलींच्या फाईल फोटो जे वर्तमान पत्रामध्ये छापले होते, खालील प्रमाणे आहे :–



प्रेरणा झाली की अशा घटनांना टाळले गेले पाहिजे. निर्धनता तसेच समाजात पसरलेली कुप्रथा जसे हुंड्याची प्रथा, विवाहात मनमानी खर्च करणे, मृत्यु भोज, मोठी वरात इत्यादी–इत्यादी तसेच अन्य वाईट गोष्टी जशा नशा इत्यादी–इत्यादींच्या कारणाने निर्धन व्यक्ती कर्ज तसेच गंभीर आजाराने परेशान होऊन तसेच आपल्या मुलींचे लग्न व महागाईच्या शिक्षणाने आत्महत्याची परिस्थिती उत्पन्न होते. जसे की या दु:खद समाचारात एका आई–वडिलांनी पुत्रप्राप्तीसाठी चार मुलींना जन्म दिला, पाचवा मुलगा झाला. वडिलांना टी.बी. चा आजार लागला (जसे की समाचार पत्रामध्ये बातमी छापली आहे) त्या व्यक्तीच्या समोर हुंडा रूपी राक्षस आडवा उभा राहिला. त्याने माहित नाही किती दिवस किंवा महिने विचार केला असेल की माझा मृत्यू होऊ शकतो, एकटी पत्नी चार

मुलींना कसे शिक्षण देईल कसे दिवसेंदिवस समाजामध्ये वाढत चाललेल्या चुकीच्या घटनांपासून माझ्या मुलींच्या इज्जतीचे रक्षण करेल तसेच विवाहाचा खर्च कशी निभावेल.

प्रत्येक व्यक्तीला आपली मुले भले मुलगा असो किंवा मुलगी, जिवापेक्षा प्रिय असतात. परंतु हूंडा रुपी राक्षस व समाजात प्रति दिवस होत असलेल्या बलात्कारांच्या घटनेच्या भीतीने या वडिलांना इतके मजबूर केले की आपल्या जिवाच्या तुकड्यांना तीन मासूम मुलींची हत्या केली आणि स्वतः देखिल आत्महत्या केली. ही दुःखद घटना वाचून व विचार करून काळीज थरथरायला लागते.

★ संत रामपाल दासजींच्या सत्संग वचनाने लोकवेदाच्या चुकीच्या धोरणापासून सुटका मिळते. ज्या कारणाने वडिलांनी मुलाच्या प्राप्तीच्या इच्छेने चार मुलींना उत्पन्न केले. पाचवा मुलगा झाला तर संतुष्ट झाला जी एक महान अज्ञानता व सामाजिक चुकीची धारणा आहे. संत रामपाल जी महाराजांद्वारा लिहिलेल्या पुस्तकांना वाचून तसेच सत्संग ऐकून मुलगा तसेच मुलीचे अंतर समाप्त होते. वैज्ञानिक युगामध्ये मानव आपल्या सामर्थ्यानुसार एक किंवा दोन मुले उत्पन्न करुन पुढे जाऊ शकतो. दोन मुले मुलगा असो किंवा मुलगी, सामर्थ्यानुसार अधिक मुले देखिल उत्पन्न झाली तर काही दोष नाही कारण आता सरकार कडून असा कोणताच कायदा बनविलेला नाही ज्यामध्ये मुलांची संख्या निर्धारित केलेली आहे.

★ प्रत्येक प्राण्याला परमात्माच संस्कारानुसार पालन करतात :- संत रामपाल दास जी आपल्या सत्संग वचनामध्ये परमात्माचे विधान सांगतात तसेच प्रमाण देखिल सांगतात. ते सांगतात की माझ्या नातेवाईकांचा मृत्यू लहान वयातच झाला होता. चार मुले होती. त्यावेळेस मोठा मुलगा जवळपास दहा वर्षांचा, छोटा एक वर्षांचा होता. वर्तमानात ती मुले त्यांच्यापेक्षाही चांगल्या आर्थिक परिस्थितीत आहेत, ज्या इतरांचे वडील जीवित आहेत. जर त्या व्यक्तीला ज्याने मासूम मुलींना मारले, स्वत: मेला, परमात्माच्या विधानाची माहिती असते तर अशी चुक करुन घोर पाप केले नसते.

★ परमात्माचे विधान आहे की हत्या तसेच आत्महत्या करणारा नरकामध्ये जातो.

आत्महत्या तसेच हत्या दोन्ही परमात्म्याच्या विधानानुसार घोर अपराध आहेत. हे कोणत्याही परिस्थितीमध्ये होऊ नये. अज्ञानता तसेच सामाजिक कुरिती (हुंडा, शाल पांघरणे, लग्ना पर्यंत मुलींचा खर्च करने, वरातीत जास्त बोलावणे-येणे) च्या कारणाने तिन मासूम मुलींची हत्या तसेच आत्महत्या झाली. आम्ही इच्छीतो की अशी चुक कोणीही करु नये.

यासाठी संत रामपाल जी महाराजाचे सत्संग वचन ऐकून त्यांच्याशी नि:शुल्क जुडावे म्हणजे आमच्याप्रमाणे तुम्ही देखिल सुखी व्हावे, त्यांच्याशी जोडल्यानंतर शरीराचे सर्व प्रकारचे रोग नष्ट होतील. सर्व प्रकारचे व्यसन सुटतील. जीवन जगण्यासाठी थोड्याश्या मेहनतीने काम चालले जाईल. निर्धनता संपून जाईल. जीवनातील सर्व दुःख समाप्त होऊन जातील. सत्संगाने मनुष्याला जीवनाच्या मूल कर्तव्याचे ज्ञान होते. मनुष्य सर्व विकार सोडून देतो. त्याच्या जीवनात सुखांची बहार येते, कोणत्याही प्रकारची दुःख राहत नाही. यासाठी एक वेळेस खालील संपर्क सूत्रांशी अवश्य संपर्क करा. आम्ही शक्य होईल तेवढी मदत करू.

★ दिन-प्रतिदिन वाढत असलेले मुली व बहिणींवरील बलात्कार तसेच छेडछाड तसेच हुंडा बळी चे केस संत रामपाल दास जी चे तत्त्वज्ञान जे परमात्म्याच्या संविधानानुसार सांगितले गेले आहे, त्याने समाप्त होतात. व्यक्तींना परमेश्वराची भीती बनेल, ज्यामुळे तो चुकीचे कार्य करू शकत नाही. दीक्षा घेऊन मर्यादांमध्ये राहून भक्ती करावी लागते परमात्मा कबीर जींच्या शक्तीने आत्म्या मध्ये शक्ती येते. ज्यामुळे चुकीचे काम करण्याची प्रेरणा कधीही

मिळत नाही. ना कोणते चुकीचे पाऊल उचलण्याचे मन करते कारण की परमात्माच्या ज्ञानाने ते घोर पाप लागते जसे विष (**Poison**) खाण्याच्या परिणामाने परिचीत व्यक्ती विषाला स्पर्श करायला देखिल घाबरतो.

आम्ही मानव समाजाची अशी मदत करणार :-

★ आमचे गुरुदेव संत रामपाल दास जी ने कबीर मानव कल्याण समितीचे गठन केले आहे. ३६ बिरादरी मध्ये ज्या कोणाची नाजूक स्थिती उत्पन्न होईल, त्यांनी समितीच्या पुढील नंबरवर संपर्क करावा. आम्ही हर संभव मदत करू. त्यांच्या मुलींचे १०+२ पर्यंतचे शिक्षण तसेच विवाह, पुस्तके, ड्रेस ,पेन, वही स्कूल बसचे भाडे इत्यादींचा खर्च कबीर मानव कल्याण समिती करेल. जर कोणी निर्धनतेच्या कारणाने अन्य त्रासाशी झुंजत आहे तर त्याची देखिल यथासंभव मदत केली जाईल. त्यांच्या साठी अट राहील :-

१. संत रामपाल दास जी महाराजांकडून दिक्षा घेऊन आजीवन भक्ती करावी लागेल.

२. कोणत्याही नशीली वस्तूचा प्रयोग व सहयोग करायचा नाही.

३. दीक्षा घेणाऱ्या भक्ताला जे नियम निभवायचे आवश्यक आहे, ते आजीवन पालन करावे लागतील.

४. मुलींच्या आई-वडिलांना दोघांनाही नाम दीक्षा घ्यावी लागेल तसेच वर्षातून कमीत कमी चार वेळा सत्संगामध्ये मुलांसहित यावे लागेल कारण मुलांमध्ये चांगले संस्कार घडावे. दूर्गुंणापासून दूर राहतील.

५. मुली राहतील आई-वडीलांजवळ, त्यांच्या शिक्षणाचा खर्च समितीचे सदस्य देतील. त्यांची फीस, पुस्तके, ड्रेस, इत्यादींची पावती कबीर मानव कल्याण समितीच्या नावावर बनवावी लागेल. त्या परिवाराची नाव नोंदणी केली जाईल. प्रत्येक महिन्याला आपोआप त्यांच्या मुलांचा खर्च मिळत जाईल.

जर कोणी एक देखिल मर्यादाभंग केली म्हणजे दारू इत्यादींचा नशा केला किंवा अन्य नियम भंग केला तर मदत बंद केली जाईल. जर त्याने यापुढे अशी चुक न करण्याची प्रतिज्ञा केली तर सुविधा चालू केली जाईल. एक गुप्तचर विभाग शिष्यांचा बनविलेला आहे जे चूक करणाऱ्याची माहिती समितीला देतील. त्याची पडताळणी चौकशी टीम करेल. समाजातून सर्व वाईट चालीरिती समाप्त होतील. सर्वजण भक्ती करून सुखी होतील तसेच मोक्ष प्राप्त करतील. कोणीही मानव रोग, मुलींचे खर्च तसेच अन्य कर्ज (ऋण) या कारणाने हताश होऊन अनमोल मानव (स्त्री-पुरुष) जन्मास नष्ट करणार नाही. समाज सुधार, आपसातील भाईचारा, प्रेम तसेच आत्म-उद्धार होईल. भारत पुन्हा सोन्याचे पाखरु होईल. देशात सत्ययुगाचे पुनरुत्थान होईल. भारतवासी सुखाचे जीवन जगतील.

आमचे संपर्क सुत्र :- **7027000496, 7027000462,**
**7027000492, 7027000962**

प्रार्थी

सर्व सदस्य, कबीर मानव कल्याण समिति
बरवाला (हिसार), राज्य हरियाणा (भारत)